# प्रेस नोट

दि.०७/१२/२०१८

## लोकसेवक उत्तम निवृत्ती दळवी, कामगार तलाठी, वर्ग ३, अकलापूर, ता.संगमनेर यांना लाचलुचपत कायदयान्वये शिक्षा झालेबाबत

प्रस्तुत बातमीतील हकिगत अशी की, आरोपी लोकसेवक उत्तम निवृत्ती दळवी, कामगार तलाठी, वर्ग ३, अकलापूर, ता.संगमनेर यांनी तक्रारदार यांची वडीलोपार्जित जमीन भावाने विक्री केल्याने सदर जमीनीवर हरकत नोंदवून घेण्यासाठी व विहीरीची सात बारा उता–यावर नोंद लावण्यासाठी १५०००/– रुपये लाचेची मागणी केली होती. त्यावरुन तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, अहमनगर येथील कार्यालयात तक्रार दिलेवरुन दिनांक ७/८/२०१४ रोजी सापळा आयोजीत केला असता आरोपी लोकसेवक उत्तम निवृत्ती दळवी यांनी तक्रारदार यांचेकडे पंचांसमक्ष १५०००/– रुपये लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम रुपये १५०००/– पंचांसमक्ष स्वीकारली असता त्यांना रंगेहाथ पकडले होते.

सदर गुन्हयाचा तपास अॅन्टी करप्शन ब्युरो, अहमदनगर येथील तत्कालीन पोलीस निरीक्षक विजय मुतडक यांनी करुन आरोपी लोकसेवक उत्तम निवृत्ती दळवी यांचे विरुध्द मा.विशेष न्यायालय, संगमनेर येथे दि.६/१/२०१५ रोजी दोषारोपपत्र दाखल केले होते.

सदर खटल्याची मा.श्री.एच.एम.भोसले, जिल्हा न्यायाधिश–३ व सहा. सत्र न्यायाधिश, संगमनेर यांचे समोर सुनावणी होऊन आरोपी लोकसेवक उत्तम निवृत्ती दळवी यांना आज दि. ७/१२/२०१८ रोजी १)ला.प्र.का. सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे ५ वर्ष सक्त मजुरीची शिक्षा व १० हजार रुपये दंड, दंड न भरल्यास ६ महिने साधी कैद २) ला.प्र.का.सन १९८८ चे कलम १३(१)(ड) सह १३(२) प्रमाणे ५ वर्ष सक्त मजुरीची शिक्षा व १० हजार रुपये दंड, दंड न भरल्यास ६ महिने साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे. सदर खटल्याचे सरकार पक्षातर्फे अॅड.श्री.बी.जी.कोल्हे, सहायक सरकारी अभियोक्ता, संगमनेर यांनी काम पाहिले.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर कार्यालयामार्फत सर्व सामान्य जनतेला आवाहन करण्यात येते की, त्यांना कोणी शासकिय नोकर शासकिय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी करत असेल तर त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, अहमदनगर येथे संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| **कार्यालयाचा पत्ता** | **पोलीस उप अधीक्षक कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर** |
| **फोन नंबर** | **०२४१–२४२३६७७** |
| **टोल फ्रि नंबर** | **१०६४** |

पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर

Scanned by CamScanner